

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२१ ( प्रतिनिधी) :- तरूणींनी आत्मभान जागे ठेवून सामाजिक परिस्थिती समजून घ्यावी व आपल्यातील क्षमतांचा विचार करून कर्तृत्वावर विश्वास ठेवावा असे आवाहन सुप्रसिध्द कवयित्री सारिका उबाळे यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने आयोजित सहकार महर्षी कै. प्रल्हादराव पाटील व्याख्यानमालेत 'नवतारूण्य आत्मभान आणि आव्हान' या विषयावर त्या बोलत होत्या. व्य.प. सदस्य प्रा. सुरेखा पालवे अध्यक्षस्थानी होत्या. यावेळी मंचावर सिनेट सदस्य प्रा. किर्ती कमळजा, स्वप्नाली महाजन-काळे तसेच एस.एम.आय.टी. संस्थेचे प्रतिनिधी म्हणून प्रा. सुनील गरूड उपस्थित होते. सारिका उबाळे म्हणाले की, सर्व क्षमतांचा उपयोग करतांना आत्मभान यायला हवे आपली जडण-घडण, कौटुंबिक पार्श्वभूमी यावर समज अवलंबून असते. सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक परिस्थितीचे आकलन होत नाही तोपर्यंत समज येत नाही. घरात मुलगा आणि मुलगी ही विषमता आहे तर बाहेर जातीय विषमता आहे. कुटूंब व्यवस्था डळमळीत होत आहे. अशा परिस्थितीत शिक्षण, नौकरी, चांगली जीवन शैली, चांगला जीवनसाथी ही मोठी आव्हाने तरूणींसमोर आहेत. अशा परिस्थितीत आपल्यातील क्षमतांचा विचार करा आणि त्याप्रमाणे जगायला शिका असे आवाहन सारिका उबाळे यांनी केले. अध्यक्षीय भाषणात प्रा. सुरेखा पालवे यांनी जैविक वय म्हणजे तारूण्य नव्हे तर विचार, मन तरूण असेल संघर्ष करण्याची वृत्ती असेल तोवर तरूण आहात असे समजायला हवे. आजच्या काळात आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक समज आणि आत्मभान यायला हवे. बाहेरच्या जगात आमिष दाखविणारे अनेक क्षण येतील मात्र सजगता हवी असे सांगून प्रा. पालवे यांनी वैचारिक आत्मभान येण्यासाठी वाचन, लेखन करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. प्रारंभी जनसंपर्क अधिकारी डॉ. सुनील पाटील यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण चंदनकर यांनी केले. एस.एम.आय.टी. संस्थेचे अध्यक्ष ॲड रवींद्र पाटील यांनी दिलेल्या देणगीतून मुलींच्या वसतिगृहात या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते.

**बातमी क्र. २**

जळगाव दि.२१ ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा, अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रातर्फे आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त साहित्यिकांच्या गप्पा आणि विद्यार्थ्यांचे कवी संमेलन असा कार्यक्रम झाला.

साहित्यिकांच्या गप्पा कार्यक्रमात ॲड विलास मोरे, डॉ. युवराज मानकर, सतीष जैन, प्रा. रमेश माने, डॉ. सत्यजित साळवे यांना पाचारण करण्यात आले होते. प्रशाळेचे संचालक प्रा. म.सु.पगारे हे अध्यक्षस्थानी होते. यावेळी बोलतांना ज्याला माणूस होता येते तोच साहित्यिक होवू शकतो असे मत डॉ. यवराज मानकर यांनी व्यक्त केले. साहित्यिकांना माणसांची वेदना मांडता आली पाहिजे असे ॲड विलास मोरे म्हणाले. प्रा. रमेश माने म्हणाले की, ग्रामीण आणि दलित साहित्यानी आपल्याला घडवले. प्रा. सत्यजित साळवे यांनी आपल्या मनोगतात जीवनातील भावनिक वेदनेचा पदर उलगडून दाखविला. सतीष जैन यांनी जुने व नवीन लेखक वाचले पाहिजे अशी भूमिका मांडली. अध्यक्षीय भाषणात प्रा. पगारे यांनी अमराठी माणसे मराठीची वाहक होतांना आणि मराठीवर प्रेम करतांना दिसतात असे मत व्यक्त केले. हेमराज पाटील यांनी सत्रसंचालन केले. महेश सुर्यवंशी यांनी आभार मानले.

**विद्यार्थ्यांचे कवी संमेलन :** या पंधरवड्या निमित्त दि. २० जानेवारी रोजी विद्यार्थ्यांचे कवी संमेलन झाले. विद्यार्थ्यांसोबत शिक्षकांनी स्वरचित व इतरांच्या निवडक कविता सादर केल्या. यामध्ये हेमराज पाटील, महेश सुर्यवंशी, योगेश पाटोळे, निलेश चौरे आदींसह २० पेक्षा अधिक विद्यार्थी कवींनी सहभाग घेतला. अध्यक्षीय समारोप प्रा. म.सु. पगारे यांनी केला.

---

जा क्र. कबचौउमवि/१६/ बातमी/२०२५ दि २१ जानेवारी २०२५

प्रति

मा. संपादक

कृपया वरील बातमी प्रसिध्दीस देऊ सहकार्य करावे ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी